Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi Part - III / IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | वर्णव्यवस्था: सामाजिक शोषणाचे माध्यम<br>**सिद्धार्थ मुंगे** | १-४ |
| २ | मानवधिकाराचे झालेले पतन : एक अभ्यास<br>**डॉ. पुरषोत्तम रामटेके** | ५-७ |
| ३ | खानदेशातील आदिवासी भिल्ल समाज: एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर** | ८-१० |
| ४ | श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींच्या संस्कृत साहित्यातील शब्दरचना<br>**कु. चिन्नुरकर सपना नारायण**<br>**विद्यारत्न डॉ. मंजूषा कुलकर्णी** | ११-२२ |





Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३. खानदेशातील आदिवासी भिल्ल समाजः एक दृष्टीक्षेप

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
इतिहास विभाग, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

**प्रस्तावना**

खानदेशातील विविध जाती - जमातीचे लोक वांस्तवास असल्याचे निर्दशनास येते. खानदेशनातील या विविध जाती - जमार्तीच्या रुढी, परंपरा, विवाह पद्धती, खानपान, वेशभुषा, अलंकार, सण, उत्सवाची स्थिती वैशिष्टपुर्ण होती. निसर्गाच्या सानिध्यात राहणारे, निसर्गाची पुजा करणारे, कष्टकरी, काटक असणारा भिल्ल समाज खानदेशाच्या संपूर्ण परिसरात विखुरलेला आहे. भिल्ल समाज हा मुळात धाडसी, लढाऊ वृत्तीचा होता. परंतु प्राचीन आणि मध्ययुगीन काळात या बाणेदार समाजाला गुन्हे करणारी, लूटमार करणारी मागसलेली जमात म्हणून शिक्का मारला गेला. परंतु काळानुरुप त्यांच्या लढाऊ, प्रामाणिकपणाच्या आधारावर या समाजात सुधारणा घडून आल्या. जंगलात वास्तव्य करणाऱ्या भिल्लापासून ते कष्ट करुन शेती व्यवसाय करणाऱ्या भिल्ल समाजापर्यंत २० व्या शतकात मार्गक्रमण या समाजाने केले.

**भिल्ल समाज पुर्वपिठीका**

भिल्ल समाज हा मुळात डोंगरदऱ्यांमध्ये राहणारा वर्ग आहे. मध्यपुर्वेकडून प्राचीन काळात आलेल्या प्रोट्रो - ऑस्ट्रलॉईड लोकांचे भिल्ल हे वंशज असल्याचे मानववंश शास्त्रज्ञाचे मत आहे. प्राचीन महाकाव्य रामायण, महाभारतातही भिल्लाचा उल्लेख दिसून येतो. द्राविड भाषेत बिलु म्हणजे धनुष्य आणि भिल्लांचे धनुष्य हेच प्रमुख शस्त्र आहे. त्यावरुनही त्यांना भिल्ल नाव पडले असावे असे मानले जाते. इतिहासकार टॉलेमीने इ. स. पू. दोनशे ते शंभरच्या काळात खानदेशात भिल्ल लोकांची राज्ये होती असे म्हटले आहे. भिल्लांचे मूळ वस्ती स्थान हे अबू आणि आशिरगड या परिसरांतील डोंगराळ भागातील आहे. ब्रिटीश काळात गुजरात आणि खानदेशात प्रामुख्याने भिल्लाची वस्ती दिसुन येते. भिल्ल जमात ही मुळात लढाऊ बाण्याची, काटक शरीरयष्टी लाभलेली धाडसी वृत्तीची आहे. परंतु या जंगलात राहणाऱ्या जमातीत गुन्हे करणारी, चोरी लूटमार करणारी जमात मानले गेले. त्यातूनच ब्रिटीश काळात त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी दडपशाहीचा मार्ग अनुसरला गेला.

**भिल्ल समाज जाती आणि पोटजाती**

भिल्ल समाजाचे ते कोणत्या प्रदेशात राहतात यावरुन प्रकार पडतात. त्यांत प्रामुख्याने मैदानी प्रदेशात राहणारे, पर्वतीय प्रदेशात वास्तव्यास असलेले आणि तिसरे म्हणजे अन्य प्रदेशात राहणारे होत. यामध्ये मैदानी प्रदेशात राहणारे भिल्ल हे इतर भागात राहणाऱ्या भिल्ल लोकांपेक्षा पुढारलेले असतात. त्यांच्या राहणीमानात, आचारविचारात थोडा सुधारणावादी दृष्टीकोन दिसून येतो. डोंगराळ भागात राहणाऱ्या भिल्लाच्या वरडा, डांगची, धानमा, धोरपी, गावीत, खोतोल, मठवाडो, मावची, नहाल इत्यादी प्रमख जाती आहे. भिल्लामध्ये काही हिंदू धर्मीय तर काही चेतनावादी ख्रिश्चन धर्मीय असलेले आढळून येतात.



Self Attested